**मुख्य कार्यालय,**
**यशवंत नगर, विरार (प.)**
**ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०३**

**दुरध्वनी :** ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
**फॅक्स :** ०२५० - २५२५१०७
**ई-मेल :** vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र.:** ;व.वि.श.म./पापु/५०७/२०२६
**दिनांक :** १६/०६/२०२६

# प्रेस नोट

वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना पेल्हार, उसगांव व सूर्या पाणीपुरवठा योजनांमधून सुमारे ४०० दशलक्ष लिटर प्रतिदिन (MLD) पाणीपुरवठा करण्यात येत आहे. महानगरपालिका क्षेत्रातील पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीने धरणांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा आढावा मा. आयुक्त महोदय यांच्यामार्फत वेळोवेळी घेण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या पाणीटंचाई निवारण, उपलब्ध जलसाठ्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन व पाणी वापराच्या काटकसरीबाबत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन परिपत्रकांमधील निर्देशानुसार पाणीटंचाईची संभाव्य परिस्थिती विचारात घेऊन मा. आयुक्त पाणीपुरवठा व्यवस्थेचा सातत्याने आढावा घेत आहेत.

यंदा अल निनोच्या प्रभावामुळे सरासरीपेक्षा कमी पर्जन्यवृष्टी होण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तविण्यात आली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत चालू वर्षी धरणांमधील उपलब्ध पाणीसाठ्यात लक्षणीय घट झाल्याचे निदर्शनास आले आहे. सद्यस्थितीतील उपलब्ध पाणीसाठा जुलै अखेरपर्यंत पुरेल, असा अंदाज आहे. वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना राबविण्यात येत आहेत. पाण्याचा काटकसरीने वापर करणे, गळती प्रतिबंधक उपाययोजना तसेच पाणीपुरवठा व्यवस्थेचे प्रभावी नियोजन याबाबत आवश्यक कार्यवाही सुरू आहे.

अल निनोचा प्रभाव व पावसाच्या आगमनास होणारा विलंब विचारात घेता, परिस्थितीनुसार भविष्यात पाणी - कपातीबाबत आवश्यक निर्णय घेण्यात येईल. याबाबतची माहिती नागरिकांना वेळोवेळी महानगरपालिकेमार्फत देण्यात येईल.

महानगरपालिका प्रशासन नागरिकांना आवाहन करते की, उपलब्ध पाणीसाठ्याचा योग्य वापर करून पाणी बचतीस सहकार्य करावे.

सही/-
(संजय हेरवाडे)
अतिरिक्त आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner